Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, FEB-MAR, 2021, VOL-9/44

# आदिवासी लोकसाहित्यातील नीतिविचार

**प्रा. किरणकुमार कवठेकर, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, डॉ.शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडा, जिल्हा. पालघर-४२१३०३. Mail id - Kirankavthekar1999@gmail.com*

**Paper Received On:** 25 MAR 2021

**Peer Reviewed On:** 30 MAR 2021

**Published On:** 1 APRIL 2021

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

विश्वातील प्रत्येक माणसाला सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे अधिष्ठान आहे. मग तो नागर, नांगर (ग्रामीण), प्रगत-अप्रगत किंवा डोंगर - दऱ्यात, घनदाट जंगलात वास्तव्य करणारा आदिवासी का असेना. जो तो आपआपल्या सामाजिक - सांस्कृतिक नीतीविचारांचा अंगिकार करून जगण्याचा प्रयत्न करत असतो. पण बऱ्याचदा ऐकीव माहितीच्या किंवा कोणीतरी चुकीच्या माहितीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ वाचून आदिवासी हे हिंस्त्र पशुंप्रमाणे जीवन जगतात; शिकार करून कच्चे मांस खातात, ते नरभक्षक आहेत, स्त्रियांशी ते स्वैर संबंध ठेवतात, ते असंस्कृत आहेत, अशा प्रकारचे भाष्य 'रामायण' व 'महाभारत' काळापासून त्यांच्याबद्दल केलेले आढळते. त्यामुळे आदिवासींच्या समाज व संस्कृतीबद्दलचा चुकीचा संदेश जनमानसात पोहोचला आहे. पण वस्तुस्थिती मात्र पूर्णपणे वेगळी आहे. सुधारलेल्या जगाच्या मानाने आदिवासींचे रहाणे मागासलेले व रानटी असले तरी त्यांचे आचार - विचार व समाज व्यवस्था खरोखरीच वाखाणण्याजोगी आहे. नागर किंवा ग्रामीण भागातील माणसापेक्षाही आदिवासी माणसं आपले सामाजिक व सांस्कृतिक जीवन नितीनियमांच्या अधिन राहून परंपरांचे काटेकोर पालन करून जगत आहेत, याची जाणीव ठाणे व पालघर जिल्ह्यातील वास्तव्य करणाऱ्या कातकरी, काथोडी, धोडी, कोकणा, कोकणी, कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी ढोर, ठाकर, वारली व महाराष्ट्रातील उर्वरित आदिवासी जमातींचे पारंपरिक जीवनजगणे पाहिल्यानंतर व त्यांच्या लोकसाहित्यातील लोककथा, कथागीते, लोकगीते, म्हणी, उखाणे, कोडी इत्यादींमधून होते. त्यामुळे आदिवासींकडे इतर समाजाने पाहण्याचा पारंपरिक दृष्टीकोन बदलावा, त्यांना व त्यांचे लोकसाहित्य जाणून घेऊन त्यांच्याकडे नीतीविचारांचा ठेवा किती मौलिक व अनुकरणीय आहे, यांचा विचार व्हावा या हेतूने त्यांच्या लोकसाहित्याकडे दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न या लेखातून पुढीलप्रमाणे केला आहे.

आदिवासींच्या लोकसाहित्यातील नितीविचारांवर दृष्टीक्षेप टाकण्यापूर्वी 'नीति' किंवा 'नीतिविचार' ही संकल्पना जाणून घेणे आवश्यक वाटते. कारण त्याशिवाय आदिवासींच्या लोकसाहित्यातून कोणत्या स्वरूपाच्या

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

नीतीविचारांचा पुरस्कार केला आहे, ते स्वतःच्या जीवनाकडे, समाजाकडे व संस्कृतीकडे कोणत्या अंगाने पाहतात, ते अधिक स्पष्ट होणार नाही.

'सुगम मराठी शब्दकोश' मध्ये 'नीती' म्हणजे योग्य विचार, सदाचार," असे सांगितले आहे. तर 'नीती' म्हणजे शिष्टाचार, वर्तन असे 'मराठी विश्वकोश' मध्ये स्पष्ट केले आहे. "नीती कर्मप्रधान असून अंतिम सत्या-संबंधीच्या धारनेनुसार ती ठरवली जाते किंवा असे म्हणता येईल की, अंतिम ध्येय जो मोक्ष ( वा निर्वाण) ह्यांचे स्वरूप तत्वज्ञानात जसे मान्य केले असेल त्यानुसार तो (मोक्ष) प्राप्त करून घेण्याचा जो मार्ग त्यालाच 'नीती' म्हणतात," अशी 'मराठी तत्त्वज्ञान – 'महाकोश' मध्ये नीतिविषयक भूमिका मांडली आहे. सदर महाकोषातच पाश्चात्त्य विचारवंत हेगेल म्हणतात, "संपूर्ण अस्तित्व हे ज्या विश्वव्यापी तत्त्वांशी समरस होण्याचा प्रयत्न मनुष्य करीत असतो. या प्रयत्नात ज्या मार्गाने तो देशकाल परिस्थितीनुसार अनुभवाला येणाऱ्या मर्यादांना व उपाधींना ओलांडून जाऊ शकतो तोच मार्ग म्हणजे 'नीती' होय." तर 'ग्रीको-रोमन व ख्रिस्ती नीति विचार' जाणून घेताना. "सत्या' चे मूल्य ज्याला कळले त्याला सत्य - निष्ठा येतेच; कारण मूल्यही एक अलौकिक शक्ती असून प्रेमभावनेद्वारा मनुष्य तिकडे आकृष्ट होतो. श्रेयाचा रूपातच ती प्रिय ठरते व त्यातूनच ते (मूल्य) व्यवहारात उतरवण्याची प्रेरणा मिळते. या प्रेरणेनुसार वागणे म्हणजे केवळ अंधानुकरण नसून ज्ञानमूलक असणाऱ्या सद्‌गुणांची प्राप्ती करून घेणे होय व याचेच नाव नीती", या विचारांचा पुरस्कार केलेला पाहायला मिळतो. थोडक्यात 'नीती म्हणजे सदाचरण'. माणूस जन्माला आल्यानंतर त्याला योग्य काय अयोग्य काय याची जाणीव होऊ लागल्यापासून अनैतिक विचारांना नकार देत मानवी जीवन व समाज विकासाच्या दृष्टीने जीवनाच्या अखेरपर्यंत ज्या विचारांचा पुरस्कार व अंगीकार केला जातो ते विचार म्हणजे नीतिविचार होय, असे म्हणता येईल.

वरील प्रमाणे व्यक्त केलेल्या नीती व नीती विचार संकल्पनांची जाणीव करून घेतल्यानंतर सदर संकल्पनांच्या अनुषंगाने आदिवासींच्या कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील विविध घटना-प्रसंगी अभिव्यक्त होणाऱ्या लोकसाहित्यांचा पुढीलप्रमाणे परिचय करून घेऊया.

**कौटुंबिक जीवनातील नीतिविचार**

या दृष्टीने आदिवासी समाजाकडे पाहिल्यानंतर वारलींची कौटुंबिक जीवनशैली चटकन नजरेत भरते. वारली समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुषावर जन्मापासून मृत्यूपर्यंत एकूण सोळा संस्कार केले जातात. त्यामध्ये नाळ कापणे, झोळी बांधणे, नाव ठेवणे, जावळ काढणे, कान टोचणे, उष्टावण, गुरु करणे, घाणा कांढणे, देव करणे, घाण गाठी, लग्न लावणे, रामराम घालवणे, अंत्यसंस्कार, अंत्यविधी, पान देणे, दिवसक्रियाविधी इत्यादी संस्कारांचा समावेश आहे. हे सर्व संस्कार नितीविचारांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे मानले जातात. बाळ जन्माला आल्यानंतर 'झोळी बांधणे' म्हणजे 'सटी' किंवा 'पाचवी पुजणे' हा कार्यक्रम सुईनबाईद्वारे केला जातो.

त्यावेळी ती बाळाला कानमंत्र देते तो असा-

केळीचा खांब वाढं तसं माझा बाळं वाढं
पुनवेचा चांद वाढं तसं माझा बाळं वाढं

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

गाईचं वासरू वाढं तसं माझं बाळं वाढं
चांद सुर्याच किरण मोकळं तसं माझं बाळ मोकळं
चांदाचा शीतल प्रकाश धरतीला
तसा तुझा प्रकाश माय बापासं दिजोस
गाजे विजेला भिऊ नको
सरकार दरबारची पायरी चढू नको
काठ्या पाटलांचा मान राखजोस
आईच्या हाकेला धावत येजोस
बापाचा हाकेला पळत येजोस

सोईनबाईने बाळाला दिलेल्या या कानमंत्रातून वारली समाज नवजात बालकांवर नीतीविचारांचे संस्कार किती चांगल्याप्रकारे करतो याची कल्पना येते. तर एखाद्या मुलीला लग्नानंतर "तू सासू - सासरे, दीर व ननंद यांना काय म्हणणार?" असे जेव्हा मुली विचारतात तेव्हा ती तिच्या भावना पुढील प्रमाणे व्यक्त करते.-

डोंगरामा कबुतर दिसह निला निला
कली तू सासरासला व सासरासला काय म्हणणार?
माने मनानी व मनानी बाबा म्हणणार
डोंगरामा कबुतर दिसह निला निला
कली तू सासूसला व सासूसला काय म्हणणार?
माने मनानी व मनानी सासूसला आई म्हणणार
डोंगरामा कबुतर दिसह निला निला
कली तू दिरूसला व दिरूसला काय म्हणणार?
माने मनानी व मनानी भाऊ म्हणणार
डोंगरामा कबुतर दिसह नीला नीला
कली तू नंदसला व नंदसला काय म्हणणार?
माने मनानी व मनानी ताई म्हणणार

लग्नप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या या गाण्यातून आदिवासी मुली सासू-सासरे, दीर व ननंद यांचाकडे पहात असताना स्वतःचे आई-वडील व भाऊ-बहीण या रूपात आपले नातेसंबंध प्रस्थापित करताना दिसते. यातुन तिच्या आईवडिलांनी तिच्यावर केलेल्या संस्कारांची येथे जाणीव होते.

**सामाजिक जीवनातील नैतिकता**

वरीलप्रमाणे आदिवासींच्या कौटुंबिक जीवनातील नीतिविचार स्वतंत्रपणे जाणून घेतले असले तरी तो एक सामाजिक नैतिकतेचाच भाग आहे, हे लक्षात असणे आवश्यक आहे. कौटुंबिक जीवनातील नीतीविचारांच्या

अनुषंगाने केवळ येथे एका कुटुंबाचा विचार केला आहे. सामाजिक नैतिकतेद्वारे अनेक कुटुंबांच्या समूहमनाचा नीतिविषयक आविष्कार जाणून घ्यायचा आहे. त्या दृष्टीने विचार केला तर असे लक्षात येते की आदिवासी माणसं आपल्या समाजातील प्रत्येकाकडून चांगल्या वर्तनाची अपेक्षा करतात. त्यासाठी विविध सण-समारंभ प्रसंगी संस्कारगीते गातात व कथाही ऐकवितात. समाजातील कोणत्याही स्त्री-पुरुषाने चोरी करू नये, व्यभीचार करू नये, खोटे बोलू नये, कोणीही कोणावर अन्याय, अत्याचार करू नयेत अशी आदिवासींची किमान अपेक्षा असते. जर या सामाजिक नीतीविचारांविरुद्ध कोणी वागण्याचा प्रयत्न केला तर त्याला कोणत्या परिणामांना सामोरे जावे लागते याचीही जाणीव गीतांद्वारे करून देतात. त्या अनुषंगाने पुढील गीत पाहण्यासारखे आहे-

नथ्या जन्म कोठं झाला रं नथ्या जन्म कोठ झाला रं
जन्म सिंपोड्याला झाला रं जन्म सिंपोड्याला झाला रं
नथ्या लहानपणात होता रं नथ्या लहानपणात होता रं
नथ्या शालेमधी टाकला रं नथ्या शालेमधी टाकला रं
नथ्या शालेतून निघाला रं नथ्या शाळलेतून निघाला रं
नथ्या चोरी कराय शिकला रं चोरी कराय शिकला रं
नथ्यानी पहिली चोरी केली रं नथ्यानी पहिली चोरी रं
चोरी कोंबड्यांची केली रं चोरी कोंबड्यांची केली रं
नथ्या पोलीस पाटी आली रं नथ्या पोलीस पाटी आली रं
नथ्याने दुसरी चोरी केली रं नथ्याने दुसरी चोरी केली रं
चोरी कोंबड्यांची केली रं चोरी कोंबड्यांची केली रं
नथ्या पोलिस पाटी आली रं नथ्या पोलीस पाटी आली रं
नथ्या पललाय सावर्याला रं नथ्या पललाय सावर्याला रं
नथ्या पललाय कोड्गावलार नथ्या पललाय कोडगावला रं
नथ्या पहिली गोळी मारली नथ्या पहिली गोळी मारली रं
नथ्या पोलीस पाटी आली रं नथ्या पोलीस पाटी आली रं
नथ्या तिथून हू पललाय रं नथ्या तिथून ही पललाय रं
नथ्या पललाय सावर्याला रं नथ्या पललाय सावर्याला रं
नथ्या पोलीस पाटी आली रं नथ्या पोलीस पाटी आली रं
नथ्या पोलीस पाटी आली रं नथ्या पोलीस पाटी आली रं
नथ्या मेंगलाय टेबलावर रं नथ्या मेंगलाय टेबलावर रं
नथ्या दुसरी गोली मारली रं नथ्या दुसरी गोली मारली रं
नथ्या ढेल्यावरून गेली रं नथ्या ढेल्यावरून गेली रं

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

नथ्या तिसरी गोली मारली रं नथ्या तिसरी गोली मारली रं
नथ्या सातेखाली गेली रं नथ्या साते खाली गेली रं
नथ्या पडलाय धरणीवर रं नथ्या पडलाय धरणीवर रं
हात जोडितो सूर्याला रं हात जोडितो सूर्याला रं
नथ्या आई-बापाला हाका मार रं नथ्या मित्र-मंडळीला हाका मार रं

सदर कथागीतातून नथ्याच्या निमित्ताने कोणीही चोरी करू नये, प्रामाणिकपणे स्वकष्ट करून जगावे अन्यथा त्यांचे परिणाम वाईट होतात, याची जाणीव करून दिली आहे. मूलत: आदिवासी माणसं चोऱ्या करत नाहीत. त्यांच्या गरजा कमी असल्याने व त्यांच्यावर प्रामाणिकपणे जगण्याविषयीचे पारंपरिक संस्कार झाल्याने ते प्रसंगी उपाशी राहतील पण स्वकष्टाचेच खातील याची प्रचिती त्यांच्या जीवनाचा वेध घेतल्यानंतर येते.

**सांस्कृतिक जीवन**

इतरांच्या तुलनेत आदिवासींचे सांस्कृतिक जीवन जगणे पूर्णत: भिन्न आहे. निसर्गाशी एकरूप होऊन व निसर्गातील विविध घटकांना देव मानून जगणारे आदिवासी बांधव स्वच्छंदीवृतीने जीवनाचा आनंद उपभोगताना दिसतात. भूक, उपासमार, दारिद्र्य हे त्यांच्या जीवनाचे स्थायी भाव असले तरी गौरी, गणपती, दसरा, दिवाळी, मकरसंक्रांत, होळी अशा विविध सणांच्या निमित्ताने त्यांनी आपला पारंपरिक सांस्कृतिक वारसा चांगल्याप्रकारे जपला आहे. हा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी ढोल नाच, तारपानृत्य, कांबडनाच, घोरनाच, मांदळ नृत्य, गौरीनृत्य, झिंगी नाच अशी विविध प्रकारची नृत्ये करतात. नृत्यप्रसंगी (तारपा नृत्याशिवाय) दैनंदिन जीवनातील अनेकविध विषयांवर व देवी-देवतांवरील श्रद्धाभाव प्रकट करण्यासाठी विविध स्वरूपाची गाणी गातात. मनोरंजनाच्या हेतूने व आपला भक्तिभाव प्रकट करण्याच्या दृष्टीने आदिवासी नृत्य करत असले, गाणी गात असले तरी त्याला नीतीनियमांचे अधिष्ठान आहे. हे प्रामुख्याने तारपानृत्य, गौरी नृत्य व झिंगींचा नाच याप्रसंगी पहायला मिळते. सदर प्रकारची नृत्ये करताना स्त्री-पुरुष एकत्र नाचतात पण नाचताना नृत्य व गीतांमधून निखळ आनंद उपभोगतात. वासनांध भूमिकेतून ते एकमेकांकडे पहात नाहीत याचे दर्शन घडते. जर तसा कोणी प्रयत्न केला तर त्याला आदिवासी स्त्री कशी सामोरी जाते ते पुढील प्रमाणे गौरी नृत्य करताना गायल्या जाणाऱ्या गाण्यातून पहायला मिळते.

पुलावर खेळ चांगुणा
खेळता सुपली हरवली गं
तिकूण आला गायकेदादा
माझी सुपली दे गवसुनी रं
होशिल का अंगाची अस्तुरी गं
तवा दे तं सुपली गवसुनी गं
हलकट मेल्या पापी चांडाळा

नाय होत अंगाची अस्तुरी रं
नको देव सुपली गवसुनी रं
जावून सांगन आयेला आयेला रं
जावून सांगन बापाला बापाला रं
नेईल पाटलांचे ओटीला ओटीला रं
सांगन तुला मी कुटाया कुटाया रं

सदर गीतातून असे पाहायला मिळते की सूप शोधून देण्याच्या बदल्यात आपली अस्तुरी होशील का? असे विचारणाऱ्या गायकेदादाला, चांगुणा नावाची मुलगी 'हलकट मेल्या पापी चांडाळा' असे संबोधून पाटलाच्या वाड्यावर नेऊन तुला चांगला मार द्यायला लावते' असे बेडरपणे त्याला सांगते. पण अगदी सहजपणे आपला देह कोणाचा स्वाधीन करत नाही. यावरून असे स्पष्टपणे पहायला मिळते की आदिवासी स्त्री कोणत्याही परपुरुषाच्या वासनेची शिकार होत नाही, तर उलट अशा प्रकारचे वर्तन करू पाहणाऱ्याला चांगलीच अद्दल घडविण्याचा विचार करते यातून तिच्यावर झालेल्या नैतिक सुसंस्कारांची जाणीव होते.

अशा प्रकारे आदिवासींच्या लोकसाहित्यातून व्यक्त होणारे नीतिविचार किती व्यापक व उच्च दर्जाचे आहेत याची वरील प्रमाणे थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही साहित्याचा संस्कृतीशी अन्योन्य संबंध असतो. हे लक्षात घेऊन आदिवासींच्या लोकसाहित्याकडे पाहिले तर आदिवासी माणसं ज्या स्वरूपाचे जीवन जगतात त्यांचेच प्रतिबिंब आपल्याला त्यांच्या लोकसाहित्यात पाहायला मिळते. आपले लोकसाहित्य मौखिक पद्धतीने टिकवून ठेवणारी आदिवासी माणसं अज्ञानी, अशिक्षित व गरीब आहेत. पण सामाजिक व सांस्कृतिक जीवन जगत असताना ते स्वतःच्या जीवनाकडे; समाज व संस्कृतीकडे किती व्यापक भूमिकेतून पहातात याचा प्रत्यय येतो. व दुसरीकडे नागर संस्कृतीतील व स्वतःला सुशिक्षित, सुसंस्कृत समजणारी अनेक माणसं आज नीतिमूल्यांचा कसा ऱ्हास करत आहेत, याची वारंवार जाणीव होते. म्हणून स्वतःला सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजाने आदिवासींकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे व त्यांच्याकडे असणाऱ्या चांगल्या नीतिमूल्यांचा, जीवनमूल्यांचा अंगीकार केला पाहिजे, असे मला वाटते.

**व्यक्ती संदर्भ**

*अंधेर महादेव सावजी, मु. पो. सुत्रकार, ता. तलासरी, जि. पालघर.*
*दशरथ सिताराम तुंबडा, मु. पो. आंबेघर, ता. विक्रमगड, जि. पालघर.*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*